सन २०२६-२७ करिता मुख्यलेखाशीर्ष २०५२ - सचिवालय सर्वसाधारण सेवा (००) (१०) माहिती तंत्रज्ञान संचालनालय (२०५२ ०४८२) (कार्यक्रम) खालील १७-संगणक खर्च या तपशीलवार शीर्षाखालील मंजूर अनुदानातून निधी वितरण करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग

शासन निर्णय क्र.मागणी-२०२६/प्र.क्र.१११/TECH-1 (E-1804258)

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दि. २१ ऑगस्ट, २०२६

संदर्भ : सामान्य प्रशासन विभाग (मातं), शासन निर्णय क्रमांक. संकीर्ण-१७२४/प्र.क्र.१६२/मातं, दि.२०/०३/२०२६.

प्रस्तावना:

Facility Management Services अंतर्गत महाआयटीकडून पुरविण्यात येणाऱ्या तांत्रिक मनुष्यबळाच्या वेतनासाठी झालेल्या खर्चास उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर बाबींवरील खर्च भागविण्याकरिता निधी वितरित करण्याबाबत वित्त विभागाने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने सन २०२६-२७ करीता मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीतून **रु. १,१०,२४,५३०/-** (रु.एक कोटी दहा लाख चोवीस हजार पाचशे तीस फक्त) इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

Facility Management Services अंतर्गत महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ (महाआयटी) यांच्याकडून पुरविण्यात आलेल्या १७ तांत्रिक मनुष्यबळाचे माहे जानेवारी, २०२६ ते मार्च, २०२६ या कालावधीतील वेतन अदा करण्यासाठी होणारा खर्च भागविण्याकरिता सन २०२६-२७ करीता मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीतून **रु. १,१०,२४,५३०/-** (रु.एक कोटी दहा लाख चोवीस हजार पाचशे तीस फक्त) इतका निधी खालील अटींच्या अधीन राहून वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

i. मागणी केलेल्या निधीची रक्कम उचित असल्याची खातरजमा इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाने करावी.

ii. प्रस्तावित वेतनाच्या रकमेची पडताळणी करुन सदर वेतन यापूर्वी संबधीतांना अदा करण्यात आले नाही याबाबतची तपासणी करण्याची जबाबदारी इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाची राहील.

iii. सदर निधी ज्या प्रयोजनासाठी वितरीत करण्यात येणार आहे, त्याकरिता खर्च करण्याची दक्षता इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाकडून घेण्यात यावी.

iv. सदर रक्कमा अदा करतांना विहित कार्यपध्दतीने अनुपालन करण्याची तसेच सदर खर्चाच्या रक्कमेची उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्याची सर्वस्वी जबाबदारी इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाची राहिल.

v. यापूढे निधी वितरणाचे प्रस्ताव सादर करतांना आवश्यक निधीबाबतचा बाबनिहाय तपशील प्रस्तावात सादर करण्याची दक्षता इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाने घ्यावी.

२. इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाकडून उपरोक्त नमूद बाबीसाठी होणारा खर्च हा नेमून दिलेले **"लेखाशिर्ष मागणी क्रमांक ए-४, २०५२ सचिवालय सर्वसाधारण सेवा (००) (१०) माहिती तंत्रज्ञान संचालनालय, (२०५२ ०४८२) (कार्यक्रम) १७-संगणक खर्च"** याखाली खर्ची टाकण्यात यावा. व तो वित्तीय वर्ष सन २०२६-२७ साठी मंजूर केलेल्या अर्थसंकल्पीय अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर निधी वितरीत करण्याकरीता अधिदान व लेखा कार्यालयातून आहरीत करण्यासाठी उपसचिव, माहिती तंत्रज्ञान यांना नियंत्रक अधिकारी तसेच लेखाधिकारी, माहिती तंत्रज्ञान संचालनालय यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाने सदर खर्च करताना वित्त विभागाच्या मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका (भाग-१) १९७७ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार व वित्त विभागाच्या **अनौ.स.क्र.४४७/व्यय-४, दि. २२/०७/२०२६** अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०८२११८२६३०९०११ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DURGAPRASAD
POCHAYYA
MYLAWARAM

Digitally signed by DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=EIT and AI, 2.5.4.20=F4FD0AC26AD2A365A8E829907C5E76B911FED9B1B9E48CC2854C4B8A14B0D70C, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BEFBB0AE84804C4DA8D35ABF2195EBB1DC727DE9B0A094BEA77F4CA6BE5965DB, cn=DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
Date: 2026.08.21 18:27:20 +05'30'

(दुर्गाप्रसाद मैलावरम)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१) सचिव (इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
२) आयुक्त, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय यांचे स्वीय सहायक, मुंबई.
३) उपसचिव (अर्थसंकल्प), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर

५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

७) वित्त विभाग, कार्यासन अर्थसंकल्प, व्यय-४, मंत्रालय, मुंबई

८) रोखशाखा (३ प्रती), इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग आयुक्तालय, मंत्रालय, मुंबई

९) निवडनस्ती.